मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

# लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती!

शनिवार, ९ मार्च २०१३

# मुंबई वृत्तान्त

## अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान

वाशिंद येथील शेई गावात अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानतर्फे शैक्षणिक क्षेत्रात काम करण्यात येते. यामध्ये आदिवासी पाड्यातील शाळेमध्ये जाऊन मुलांची शाळेतील उपस्थिती वाढविणे, त्यांना मोफत वह्यावाटप, गणवेश देणे, पोषक आहार पुरविणे, आरोग्य शिबीर घेणे असे उपक्रम सातत्याने हाती घेतले जातात. निधीअभावी मर्यादित स्वरूपात संस्थेचे काम चालते. अधिक व्यापक स्वरूपात जास्तीत जास्त गरजू लोकांसाठी समाजोपयोगी काम करता यावे यासाठी मदत करण्याचे आवाहन 'अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान'तर्फे करण्यात येत आहे. इच्छुकांनी आपली मदत 'अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान', बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा लालबाग, खाते क्र. ६००४४२३३९८१ येथे धनादेशाद्वारे पाठवावी. अधिक माहितीसाठी सीताराम परब (९८२०४९७७४९), मधुकर वर्दम (९९८७७९७७७६) यांच्याशी संपर्क साधावा.